नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 12/08/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## मोटर सायकल चोरी करणाऱ्या टोळीच्या मुसक्या आवळल्या

06 मोटरसायकलसह एकुण 3,90,000/– रुपयाचा मुद्देमाल जप्त
(स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण पोलीस पथकाची कार्यवाही)

स्था.गु.शा. :– स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे पोलीस पथक दि. 11/08/2021 चे सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन खापा हद्दीमध्ये शासकीय वाहनाने फरार व पाहीजे असलेल्या आरोपींच्या शोधात पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस पथकास मुखबिराने खात्रीशीर माहिती दिली की, ''गुमगाव मॉयल कॉलनी मध्ये राहणारा प्रणय पाटील व त्याचे साथीदारांनी भेंडाळा (खापा), पाटनसावंगी, खापरखेडा या भागातून मोटर सायकल चोरी केल्या आहे.''

मुखबिराने दिलेल्या माहिती संबधात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तत्परतेने शहानिशा केली व गुमगाव येथील मॉयल कॉलनी मध्ये जावून मोटर सायकल चोरी करणाऱ्या आरोपीचा शोध घेवून प्रणय धनराज पाटील वय 23 वर्ष रा. मॉयल कॉलनी, गुमगाव, खापा तह. सावनेर जि. नागपूर यास ताब्यात घेण्यात आले. त्याचे जवळ एमएच–40/क्यु–2628 या क्रमांकाची काळया रंगाची होन्डा सिबी युनिकॉर्न मोटर सायकल मिळून आली. सदर वाहनाबाबत त्यास विचारपुस करुन वाहनाचे कागदपत्रे दाखविण्यास सांगीतले असता त्याने उडवाउडविचे उत्तरे देवून पोलीसांची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला. त्यावर पोलीसांनी त्याचे जवळी मिळून आलेल्या युनिकॉर्न वाहनाची बारकाईने तपासणी करुन त्या वाहनाचे इंजिन व चेसीस नंबर बाबत क्राईम रेकॉर्डवरुन माहिती घेतली असता सदर वाहनाचा मुळ नोंदणी क्रमांक एम.एच. 40/बीडब्ल्यू–8543 असा आढळून आला. तसेच सदरचे वाहन हे नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन सावनेर येथील अपराध क्र. 254/2021 कलम 379 भादवि अन्वये नोंद गुन्हयात चोरी गेल्याची माहिती मिळून आली. आरोपीने त्याचे जवळील वाहनावर लावलेली नंबर प्लेट क्र. एमएच–40/क्यु–2628 हे बनावटी असल्याचे पोलीसांचे निदर्शनास आले. त्यावरुन प्रणय यास अधिक विचारपुस केली असता त्याने सांगीतले की, त्याने त्याचे दोन अल्पवयीन साथीदारांसह मिळून मोटर सायकलची चोरी केलेली आहे. याव्यतीरिक्त त्यांनी आणखी 05 वाहने पाटनसावंगी, खापरखेडा, खापा या भागातून मागील काही महिन्यापासुन चोरी केल्या असून चोरी केलेले वाहने हे नवदुर्गा अर्बन क्रेडीट को–ऑपरेटीव्ह सोसायटी, मेन रोड, खापा या सोसायटीच्या इमारती मध्ये त्याच्या वडीलाच्या मालकीचे एका खोलीमध्ये ठेवल्या आहेत. सदरच्या प्राप्त झालेल्या माहितीवरुन नवदुर्गा अर्बन क्रेडीट को–ऑपरेटीव्ह सोसायटीच्या इमारती खाली असलेल्या एका खोली मध्ये ठेवून असलेले 1) हिरो स्प्लेन्डर प्लस एमएच–40/बीएक्स–6201 2) हिरो माईस्ट्रो एमएच–40/बीटी–8521 3) होन्डा शाईन एमएच–40/डब्लु–3107 4) होन्डा स्प्लेन्डर NXG एमएच–40/क्यु– 2628 आणि 5) होन्डा ड्रिम युगा एमएच–40/ऐऐ– 2233 असे एकुण 06 मोटर सायकलीसह 3,90,000/– रुपये किंमतीच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला. या सर्व वाहनासंदर्भात पोलीस स्टेशन सावनेर, खापरखेडा आणि खापा येथे गुन्हे नोंद असल्याची माहिती मिळून आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या तत्परतेमुळे एकुण 05 गुन्हयांतील अज्ञात आरोपीचा छडा लागला व या गुन्हयातील मुख्य सुत्रधार आरोपी प्रणय धनराज पाटील यास त्याचेकडून जप्त केलेल्या 06 मोटर सायकलीसह पुढील कायदेशीर कार्यवाहीकरीता पोलीस स्टेशन सावनेरच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे नेतृत्वात सहा. पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर राऊत, पोलीस नायक दिनेश आधापूरे, राजेन्द्र रेवतकर, पोलीस शिपाई अमोल वाघ, विपीन गायधने, रोहण डाखोरे, महिला पोलीस नायक नम्रता बघेल आणि चालक पोलीस नायक अमोल वाघ यांचे पथकाने पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर